INDIA'S LARGEST CONTAINER PORT

जनेप प्राधिकरण JNPA

# Trade Advisory on Operational Status at JNPA Container Terminals

**Mumbai, May 7, 2026 –** Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) - India's Largest Container Port, wishes to clarify the operational status of its container terminals in light of recent advisories issued by CFSAI and BCBA.

All five container terminals at JNPA are functioning smoothly, without congestion, and continue to operate at full efficiency. On average, JNPA receives 10–12 container vessels daily, handling approximately 22,000 TEUs of containerized cargo (imports and exports) every day. Gate operations remain steady, with around 20,000 TEUs moving by road and 2,000 TEUs by rail.

Contrary to claims of congestion, the port's operations remain uninterrupted. The current challenge lies not within the port terminals but in the shortage of trailers and drivers provided by Container Freight Stations (CFSs) and Custom Brokers (CBs).

## Key Clarifications

• **Responsibility of CFSs and CBs:** Import containers stacked at terminal yards are delivered only when trailers are placed by CFSs or CBs. It is their responsibility to ensure adequate trailer availability. If drivers are unavailable due to vacation or absenteeism, CFSs and CBs must arrange immediate alternatives.

• **No Trailer Backlog at Terminals:** Terminals have deployed additional manpower to expedite container delivery. There is no situation where trailers are waiting for loading; rather, the number of trailers arriving has reduced due to driver shortages.

• **Proactive Measures by JNPA:**

o Facilitating evacuation of containers by rail to nearby CFSs with rail sidings.

o Coordinating with Customs for expedited approvals.

o Assisting trade by arranging dedicated trains from West Bengal and Uttar Pradesh to bring back drivers currently on vacation.

## Storage and Occupancy

JNPA's total container storage capacity is 1.76 lakh TEUs. Under normal conditions, occupancy ranges between 90,000–1,00,000 TEUs. Due to increased transshipment cargo following geopolitical disturbances in the Middle East, occupancy as on 7th May 2026 is 1.18 lakh TEUs, which is only 67% occupancy. Of this, only 26,000 TEUs are transshipment containers, which are not causing congestion. The higher occupancy is solely due to delays in trailer mobilization by CFSs and CBs.

**Call to Action**

JNPA reiterates that port operations are not congested. However, the pendency of import containers will only be resolved when CFSs and Custom Brokers urgently mobilize sufficient trailers and drivers. JNPA stands ready to extend all possible support, but the responsibility of container evacuation rests with the CFSs and CBs.

"*JNPA remains committed to providing the best services to its customers. We urge CFSs and Custom Brokers to immediately arrange adequate trailers and drivers to ensure smooth evacuation of import containers from the terminal yards.*"

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.

Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a shallow water berth for general cargo operated by Nhava Sheva Distribution Terminal Pvt. Ltd. (NSDT). A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium and the additional liquid cargo terminal developed by JNPA will be operated by M/s JSW - JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal containers.

Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India.

JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, the 13th Major Port of India in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be a 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**

Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +91 9920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

**Visit our website and social media to learn more:**

JN Port: www.jnport.gov.in
LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority
X: @JNPort
Instagram: @jnpaport
Facebook: @JNPA

— Ends —

जनेप प्राधिकरण JNPA | INDIA'S LARGEST CONTAINER PORT

## जेएनपीए कंटेनर टर्मिनल्सच्या कार्यान्वयन स्थितीबाबत व्यापारी सूचना

**मुंबई, 7 मे 2026 –** जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) - भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर, सीएफएसएआय (CFSAI) आणि बीसीबीए (BCBA) यांनी नुकत्याच जारी केलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर आपल्या कंटेनर टर्मिनल्सच्या कार्यान्वयन स्थितीबद्दल स्पष्टीकरण देऊ इच्छिते.

जेएनपीए येथील सर्व पाच कंटेनर टर्मिनल्स सुरळीतपणे कार्यरत असून कोणतीही गर्दी किंवा अडथळा नसताना पूर्ण कार्यक्षमतेने सेवा सुरू आहेत. दररोज सरासरी 10 ते 12 कंटेनर जहाजे जेएनपीएमध्ये दाखल होत असून, आयात-निर्यात मिळून सुमारे 22,000 टीईयू कंटेनर मालाची हाताळणी केली जात आहे. गेट ऑपरेशन्सदेखील स्थिर असून, दररोज सुमारे 20,000 टीईयू मालाची रस्तेमार्गे तर 2,000 टीईयू मालाची रेल्वेमार्गे वाहतूक केली जात आहे.

गर्दीबाबत करण्यात येत असलेल्या दाव्यांच्या विपरीत, बंदरातील कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत सुरू आहे. सध्याची अडचण ही बंदर टर्मिनल्समध्ये नसून, कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) आणि कस्टम ब्रोकर्स (सीबी) यांच्याकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या ट्रेलर्स आणि चालकांच्या कमतरतेमुळे निर्माण झाली आहे.

**महत्त्वपूर्ण स्पष्टीकरणे**

- **सीएफएस आणि सीबी यांची जबाबदारी:** टर्मिनल यार्डमध्ये ठेवण्यात आलेले आयात कंटेनर्स हे सीएफएस किंवा सीबी यांच्याकडून ट्रेलर्स उपलब्ध करून दिल्यानंतरच वितरित केले जातात. पुरेशा संख्येने ट्रेलर्स उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. सुट्ट्या किंवा अनुपस्थितीमुळे चालक उपलब्ध नसल्यास, पर्यायी व्यवस्था तातडीने करणे आवश्यक आहे.
- **टर्मिनल्समध्ये ट्रेलर्सची कोणतीही प्रलंबित रांग नाही:** कंटेनर वितरण प्रक्रिया जलद करण्यासाठी टर्मिनल्सकडून अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. लोडिंगसाठी ट्रेलर्स प्रतीक्षेत असल्याची कोणतीही परिस्थिती नाही. उलट, चालकांच्या कमतरतेमुळे टर्मिनलमध्ये येणाऱ्या ट्रेलर्सची संख्या कमी झाली आहे.
- **जेएनपीएकडून करण्यात येत असलेल्या सक्रिय उपाययोजना:**
  - रेल्वे सायडिंग असलेल्या जवळील सीएफएस पर्यंत कंटेनर्सची रेल्वेमार्गे जलद वाहतूक सुलभ करणे.
  - मंजुरी प्रक्रियेला गती देण्यासाठी सीमाशुल्क विभागाशी समन्वय साधणे.
  - सध्या सुट्टीवर असलेल्या चालकांना परत आणण्यासाठी पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश येथून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था करून व्यापार क्षेत्राला सहाय्य करणे.

**साठवण क्षमता आणि ऑक्युपन्सी**

जेएनपीएची एकूण कंटेनर साठवण क्षमता 1.76 लाख टीईयू इतकी आहे. सामान्य परिस्थितीत ऑक्युपन्सी 90,000 ते 1,00,000 टीईयू दरम्यान असते. मध्यपूर्वेतील भू-राजकीय परिस्थितीमुळे ट्रान्सशिपमेंट कार्गोमध्ये वाढ झाल्याने 7 मे 2026 रोजी ऑक्युपन्सी 1.18 लाख टीईयू इतकी नोंदविण्यात आली असून, ती एकूण क्षमतेच्या केवळ 67% आहे. यापैकी फक्त 26,000 टीईयू हे ट्रान्सशिपमेंट कंटेनर्स असून, त्यामुळे कोणतीही गर्दी निर्माण झालेली नाही. ऑक्युपन्सीमध्ये झालेली वाढ ही केवळ सीएफएस आणि सीबी यांच्याकडून ट्रेलर्सच्या उपलब्धतेत झालेल्या विलंबामुळे आहे.

**आवाहन**

जेएनपीए पुन्हा एकदा स्पष्ट करत आहे की, बंदरातील कामकाजात कोणतीही गर्दी किंवा अडथळा नाही. मात्र, आयात कंटेनर्सची प्रलंबित स्थिती दूर करण्यासाठी सीएफएस आणि कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. जेएनपीए सर्वतोपरी सहकार्य करण्यास सज्ज आहे; तथापि, कंटेनर्सच्या वाहतूक व निकासीची प्राथमिक जबाबदारी सीएफएस आणि सीबी यांच्यावरच आहे.

*"जेएनपीए आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. टर्मिनल यार्डमधून आयात कंटेनर्सची सुरळीत निकासी सुनिश्चित करण्यासाठी सीएफएस आणि कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची व्यवस्था करावी, असे आम्ही आवाहन करतो."*

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**

**जनेप प्राधिकरण:**

अंबिका सिंग

सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677

ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in

लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort

इंस्टाग्राम: @jnpaport

फेसबुक: @JNPA